# सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर अमरावती**

Email:- roamravati@dtemaharashtra.gov.in internet-http://www.jdroamt.org
Phone:- 0721-2573027, 2572577 Fax No.-0721-2661453


**महत्वाचे**

क्रमांक : विकाअ/लेखा/महा.हरित सेना/२०१७-१८/ 1128
दिनांक : 11 MAY 2017

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी संस्था
सर्व शासकीय/अनुदानित/विना अनुदानित/पदव्युत्तर पदवी संस्था

विषय :- वनविभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत
संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र रोहयो/काव्य/कावि- १४/१७ दि. २४/०४/२०१७

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे संदर्भिय पत्रान्वये वनविभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणीची कार्यवाही करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे संदर्भिय पत्र व त्यासोबतचे सहपत्र सोबत जोडलेले आहे. तरी त्या अनुषंगाने वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर अधिकाधिक प्रमाणात सदस्य नोदणी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत : १) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना माहितीकरीता मानार्थ सादर.
२) प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना कार्यालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याकरीता.

# जिल्हाधिकारी,अमरावती यांचे कार्यालय
## कॅम्प अमरावती-४४४६०२

दूरध्वनी क्र.-०७२१-२६६२५०५ फॅक्स-०७२१-२६६२८४३

Email- egsdycoll.amr-mh@gov.in


क्रमांक/रोहयो/काव्य/कावि- १४ /१७ दिनांक-२४/०४/२०१७

प्रति,

१) उप विभागीय अधिकारी-------------------------(सर्व)
२) तहसिलदार-------------------------(सर्व)
३) गट विकास अधिकारी-------------------------(सर्व)
४) कार्यकारी यंत्रणा सहसंचालक, तंत्र शिक्षण, अम.-------------------------(सर्व)

**विषय :- वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत.**

**संदर्भ:- १) मा.श्री सुधीर मुनगंटीवार,मंत्री,वित्त व नियोजन ,वने,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र सावविं-२०१७/१३१/१७ दि.२५/०१/२०१७.**
**२)श्री.अनिल भटकर,विशेष कार्य अधिकारी,मा.पालकमंत्री अमरावती यांचे पत्र क्र राज्यमंत्री/उ.ख,प,सा.बां/जनरल/४५३/२०१७ दि.२९/०३/२०१७.**

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते कि,जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतु बदल या पार्श्वभूमिवर आणि राज्यातील वनक्षेत्र २० % वरुन ३३ % पर्यत नेण्याचा भाग म्हणून वृक्षारोपणाची गती तुटू न देता,त्यामध्ये सातत्य ठेवावे,असा निर्णय शासनाने घेतला आहे.त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उदिष्ट ठरविण्यात आले आहे.त्याबाबत शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक सावविं-२०१६/प्र क्र८०/फ-११ दिनांक १०/१०/२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

१.नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाच्या व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाव्दारे जन चळवळीत रुपांतरित करुन यशस्वीरित्यार राबविण्यासाठी मोठया प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे.यासाठी महाराष्ट्र हरित सेना स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यत किमान १ कोटी लोकांनी स्वयंस्फुतीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी असे अपेक्षित आहे.नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याने व त्यानंतर प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर किंवा एसएमएस वर पाठविले जाते.

२.ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड,संगोपन,वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल.तसेच या उपक्रमात उत्तम काम करणा-या सभासदांना बक्षीस योजना व इतर सवलतीव्दारे सन्मानित करण्याची योजना शासनाचे विचाराधीन आहे.

३.मा.पालकमंत्री अमरावती यांनी जिल्हातील सर्व शासकीय विभाग व यंत्रणा,सामाजिक संघटना,कर्मचारी संघटना,यांना महाराष्ट्र ग्रीन आर्मीचे सदस्य करुन जिल्हात वृक्षारोपणाचा कार्यक्रम सन २०१७-१८ मध्ये यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीकोणातुन सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**सहपत्र**-संदर्भीय पत्र १,२

जिल्हाधिकारी अमरावती

**प्रतिलिपी :-**

१) मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती यांना माहिती करिता सस्नेह अग्रेषित.
३) उपवनसंरक्षक,वनविभाग,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाही करिता.
४) उपसंचालक,सामाजिक वनीकरण,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाही करिता.
५) श्री.अनिल भटकर,विशेष कार्य अधिकारी,मा.पालकमंत्री अमरावती यांना माहिती करिता.

जिल्हाधिकारी अमरावती

राज्यमंत्री/उ.ख.प.सा.बां./जनरल/पालकमंत्री/....../२०१६
कार्यालय-अमरावती.
क्र: २१/०३/२०१६

राज्यमंत्री
उद्योग व खनिकर्म, पर्यावरण,
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक :

**महोदय,**

**उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र हरित सेना योजना" स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने वृक्षारोपणाची गती वाढविण्याकरीता जिल्हास्तरावर शासनाच्या सर्व विभागांचा समावेश करून कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी करावयाची आहे. सोबत मा. मंत्री, वित्त व नियोजन यांचे पत्राची प्रत जोडली आहे.**

**करीता जिल्हयातील सर्व शासकिय विभाग व यंत्रणा, सामाजिक संघटना, कर्मचारी संघटना यांना महाराष्ट्र ग्रीन आर्मीचे सदस्य करून जिल्हयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम सन 2017-18 मध्ये यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीकोणातुन संबंधीत विभागाला निर्देश दयावेत असे मा. मंत्री महोदय यांचे निर्देश आहेत.**

**(अनिल भटकर)**
**विशेष कार्य अधिकारी**

**प्रती,**
**मा. जिल्हाधिकारी,**
**अमरावती.**

रो. ह. भाग
आवक क्र : 17/9/58
दिनांक: 10.4.2017

जा.क्र./मंत्री/वि.नि.-वने/मं.का./ ९३९/१६ /दिनांक

मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : २५/०१/२०१६

विषय :- वन विभागाच्या "महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या" संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत.

महोदय,

राज्यामध्ये १ जुलै, २०१६ रोजी जनतेच्या सहभागाने एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवण्याचे उद्दिष्ट सहज ओलांडले गेले हे आपणांस कळविण्यास मला आनंद वाटतो. प्रत्यक्षात एकाच दिवशी २.८३ कोटी वृक्ष लागवड झाली. "लिमका बुक ऑफ रेकॉर्ड" या संस्थेने या आगळ्या वेगळ्या आणि नाविन्य कार्यक्रमाची दखल घेतली आहे. आपल्या सर्वांच्या प्रामाणिक, आणि स्वयंस्फुर्तीने केलेल्या कामामुळे हे यश संपादन करता आले. त्याबद्दल मी आपले मनःपुर्वक आभार मानतो व आपले अभिनंदन करतो.

२. जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतु बदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : सावंवि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शासनाच्या सर्व विभागांचा समावेश आहे.

३. नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करुन यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी "महाराष्ट्र हरित सेना" स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी स्वयंस्फुर्तीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे व त्यानंतर प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर किंवा एसएमएस वर पाठविले जाते.

४. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षीस योजना व इतर सवलतींद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे.

५. पालकमंत्री म्हणून जिल्ह्यातील अनेक शासकीय विभाग व यंत्रणा आणि जनसमान्यांशी आपला दैनंदिन संबंध येत असतो. तसेच आपला लोकसंपर्क दांडगा आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण अहोरात्र मेहनत घेत आहात. त्यामुळे आपल्या संपर्कात असलेल्या विविध क्षेत्रातील लोक आणि शासकीय विभागांतर्गत कर्मचारी/अधिकारी हयांनी सदस्य नोंदणी कार्यक्रमात पुढाकार घेवून, जास्तीत जास्त सदस्य नोंदणी केल्यास, राज्यामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यास मोठा हातभार लागेल. वन, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी सदस्य नोंदणी मध्ये अशा सर्वजणांना मदत करतील.

६. तरी, आपणाशी जोडल्या गेलेल्या वर नमूद सर्वजणांना "महाराष्ट्र ग्रीन आर्मीचे" सदस्य होवून या राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यास आपण आवाहन करावे अशी मी आपणास विनंती करतो.

सस्नेह !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रति,
सर्व पालकमंत्री